ग्रं. सं. ठाणे
काव्य
१९३३
१९९६

# रुंजवी

रॉय किणीकर

REFBK-0015573



REFBK-0015573
REFBK-0015573
मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
वा. क्र. १५५६३
मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत

रॉक कार्व्हालो

जयहिंद
प्रकाशन
ठाकुरद्वार, मुंबई २

ग्रंथ संग्रहालय ठाणे

प्रकाशक :
ग. का. रायकर
जयहिंद प्रकाशन,
झावबावाडी,
ठाकुरद्वार, मुंबई २.

●

मुद्रक :
वामन भिडे
श्री राजमुद्रा,
रविउदय कंपाउंड,
टिळक रोड,
घाटकोपर, मुंबई ७७.

●

मुखपृष्ठ :
ग. आ. गांगल
जी. डी. आर्ट,
'स्टुडिओ गांगल,'
दादर, मुंबई १४.

●

© रॉक कार्व्हालो

●

मूल्य ३ रुपये

## निवेदन

माझे कविमित्र श्री. रॉक कार्व्हालो, बी. ए. (ऑनर्स), यांचा हा पहिला कवितासंग्रह प्रकाशित करतांना मला आनंद होत आहे. वास्तविक श्री. कार्व्हालो यांचा हा कवितासंग्रह कांहींसा उशिरां प्रसिद्ध होत आहे असें म्हटलें पाहिजे, कारण १९४५ सालापासून ते काव्यरचना करीत आहेत आणि आतांपर्यंत त्यांच्या सुमारें दोनशें कविता विविध नियतकालिकांतून प्रसिद्ध होऊन ते मराठी वाचकांना परिचितहि झालेले आहेत. त्या कवितांपैकीं फक्त साठ निवडक कविता येथें संग्रहित केल्या असून कालदृष्ट्या ज्या क्रमानें त्यांची निर्मिति झाली, त्याच क्रमानें त्या येथें दिल्या आहेत. हेतु हा, कीं कवीच्या काव्याच्या प्रकृतीचा व प्रवृत्तीचा स्थित्यंतरक्रम वाचकांपुढें असावा. मराठी काव्यरसिक 'शांभवी'चें यथायोग्य सेवन करतील अशी आशा आहे.

— प्रकाशक

शां भ वी

प्रथमावृत्ति

२४ सप्टेंबर १९६६



शु भ दा – अ मि ता
या
कन्याद्वयाच्या
अवखळ
पण
लोभस
अजाणपणास
ही
काव्यकृति
अर्पण

।

रॉक कार्व्हालो

## अनुक्रम


१. मी शांभवी .. .. ९
२. खुणा .. .. १०
३. प्रतीति .. .. ११
४. काठिन्य हवें .. .. १२
५. कां येशी .. .. १५
६. संकोच .. .. १६
७. तुझ्यासाठीं .. .. १८
८. वळणावर .. .. २०
९ चिकित्सा .. .. २१
१०. तेव्हांपासुन .. .. २२
११. नवता .. .. २३
१२. येणारच जर .. .. २४
१३. कांहींतरी .. .. २५
१४. त्रिवेणी .. .. २६
१५. शारदेच्या दालनीं .. २७
१६. चल मागें फिर .. २९
१७. पहिलें स्वप्न .. .. ३०
१८. निर्झरिणी .. .. ३२
१९. याचक .. .. ३४
२०. असुराच्या छातीवरतीं ३६
२१. जन्म नव्यानें घेई खिस्ता ३८
२२. समुद्रमंथन .. .. ४२
२३. मृत्यु .. .. ४३
२४. ओढ .. .. ४५
२५. विरहिणी .. .. ४६
२६. पहिला पाऊस .. ४७
२७. ताजमहाल .. .. ४९
२८. घरकुल .. .. ५१
२९. स्वप्न पडावें .. .. ५३
३०. याद जळत राहिली .. ५५

३१. बदल .. .. ५६
३२. आलिस पुन्हां .. ५७
३३. इशारा .. .. ५९
३४. झडेल नौबत .. .. ६१
३५. अशाच एका सायंकाळीं ६३
३६. नाहीं अजुनी .. .. ६५
३७. ज्ञात आहे .. .. ६७
३८. कैफियत .. .. ६९
३९. उन्मेष .. .. ७३
४०. गुलाल आहे इथली माती ७४
४१. ओघळले रक्त जिथें .. ७५
४२. विसांवलेला घाट .. ७७
४३. आंकडेमोड .. .. ७९
४४. तुला नकळत .. .. ८०
४५. आज अकल्पित .. ८२
४६. तारा थबकला आहे .. ८४
४७. नवप्रभात महाराष्ट्राची ८७
४८. या मातीला चढे रक्तिमा ८९
४९. माझी खोड .. .. ९०
५०. मीच किनारा .. .. ९१
५१. झिंग .. .. ९२
५२. कळल्यावर .. .. २३
५३. आगमन .. .. ९४
५४. मनाच्या गुहेंत .. ९५
५५. आस .. .. ९६
५६. हवें–नको .. .. ९७
५७. रुसवा .. .. ९८
५८. तें माझें घर नाहीं .. ९९
५९. स्वर्गस्वप्न .. .. १०२
६०. फक्त उरावी याद .. १०३

## मी शांभवी

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. 94463

स्वातीघरची
मोतिरसाची
लेवुन कांती
उधाणरातीं
रौप्यरेशमी
ओघळलें मी
हिमस्वर्लोकीं
विद्युच्चषकीं

मला प्राशुनी
धुंद नर्तनीं
कामीं, प्रणयीं
न्यायीं, विनयीं
उग्र प्रकोपीं
तपीं, प्रतापीं
त्रितापहारी
त्रिशूलधारी

# खुणा

खोल खुणा या इथें उमटल्या
मुक्त भावना सहर्ष खुलल्या

ज्या हृदयाच्या मृदुतम भूवर
आलिस टाकित पाउल नवथर
त्यावरी उमटल्या खोल खुणा
कळयाफुलांच्या रांगा फुलल्या

फिरलिं पाउलें तुझीं नाचरीं
मनांत घुमली तशी भिंगरी
झुळकीवाणी आणि अलगद
स्नेहसुगंधी लहरी शिरल्या

उत्सुकतेच्या तरल कल्पना
अननुभूतिच्या मुग्ध वेदना
होत घडीभर मुक्त पुलकित
अधीरलेल्या जिवण्या जुळल्या

तुझिमाझी ही एक सफलता
कारण मी मार्गांत थबकतां
दुरुन कुठुनशा येउन अवचित
मला बिलगल्या तुझ्या सांवल्या !

## प्रतीति

वसुंधरेच्या छातीवरले
तरळुन गेले विंध्यसह्याद्री
आळसावुनी पहुडतांच तूं
नकळत कसली लागुन तंद्री

पर्वतावरिल टणक निमुळतीं
श्यामलवर्णी ताठर शिखरें
जरा थरारुन सुस्थिर झालीं
सलज्जतेचें भरुन कांपरें

अशी शहारुन सबंध धरती
कधींमधीं तरि कंप उठावा
भूमीसमान रुंदटशा तव
वक्षावरतीं प्रतीत व्हावा

# काठिन्य हवें

मनगटांत लागतो भिनावा रस लोहाचा तप्त
काठिन्य हवें कडव कणखर लाल प्रखर पेशींत

इथें अम्हांला कलिकालाला भस्मायाची ईर्ष्या
आणि मनांतुन निर्मायाची स्वतंत्र नूतन दुनिया
काळाला नी क्षितिजालाही नव घालाया हद्द
मनगटांत लागतो भिनावा रस लोहाचा तप्त

अनिष्ट सामाजिक बंधांच्या उरल्यासुरल्या भिंती
पुराणांतलीं विधिनियमांचीं हादरणारीं घरटीं
नव्या युगाच्या धगधगीवरी करावयाला दग्ध
मनगटांत लागतो भिनावा रस लोहाचा तप्त

येथ प्रकटलें भूत नागवें भेसुर दारिद्र्याचें
तख्त चालवी मत्त पाशवी अधिसत्ता जुलमाचें
त्या भूताचा, त्या सत्तेचा अंतिं कराया अंत
मनगटांत लागतो भिनावा रस लोहाचा तप्त

रक्ताच्या वाहल्या आजवर असंख्य येथें सरिता
त्या रक्ताच्या कणाकणाची परी न कोठें गणना
बदला रक्ताचा घेण्याची पुरी कराया खंत
मनगटांत लागतो भिनावा रस लोहाचा तप्त

त्यागाचे हिमगिरी बांधिले अविरत झिजुनी ज्यांनीं
त्यांस सारुनी, शिखर वेढिलें नागांनीं विळख्यांनीं
फणे विखारी फोडुन चिरडुन ठेंचावयास दांत
मनगटांत.लागतो भिनावा रस लोहाचा तप्त

घाम पेरुनी ज उगवियलें, चोरांनीं तें लुटलें
एक वेळची भूक हराया चार न दाणे उरले
लुटणाऱ्यांना लुटल्यावांचुन कसें रहावें शांत
मनगटांत लागतो भिनावा रस लोहाचा तप्त

हवेलींतल्या गाद्यांवरतीं सुस्त माजले देह
जनहृदयांतिल दारुणतेचा जयां न कांहीं दाह
सत्तेचें आसुरी तयांच्या पाडावयास प्रेत
मनगटांत लागतो भिनावा रस लोहाचा तप्त

इतिहासांतिल गतत्यागांच्या बोलावुन त्या स्मृती
इथें मंदिरीं उभारण्याला मानवतेची मूर्ती
पुरती मातिंत पुरावयाला सैतानाची जात
मनगटांत लागतो भिनावा रस लोहाचा तप्त

जनधैर्याचा मेरुमणी जर ज्वालामुखीच बनला
संतापाचे लोळ उठवुनी उडविल सडका धुरळा
स्फोटासरशीं उडवुन द्याया दंड, मुकुट अन् तख्त
मनगटांत लागतो भिनावा रस लोहाचा तप्त

खाष्ट प्रशासनदंड, संगिनी आणि आसन भ्रष्ट
शिष्टांचीं अवजारें सारीं बुडवायाचीं दुष्ट
बुडवायाला तळास आणूं खेंचुन सागर सप्त
मनगटांत लागतो भिनावा रस लोहाचा तप्त

तारे-वारे जमवुन सारे, विश्वीं घुमवुन ग्वाही
श्रमिकांच्या दुनियेची द्याया दाहि दिशांना द्वाही
कडेकोट ते निजदेहाचे पसरुन देउं अनंत
मनगटांत लागतो भिनावा रस लोहाचा तप्त

मनगटांत लागतो भिनावा रस लोहाचा तप्त
काठिन्य हवें कडवें कणखर लाल प्रखर पेशींत

# कां येशी

लागली तुज ओढ, जुळले जधीं मनाचे धागे
आज परी ते तुटतां कां येशी मागें मागें ?

काळ एक होता, कां आज तयाची परि गणती ?
लगामही नव्हते त्याचे तुझ्या नि माझ्या हातीं
आठवणी त्या भरुन पदरीं येशि कशास वेगें ?
कोण कुणाचें नसतां, कांहिं नको मनांत जागें

होणार कसे पण वेडे ओंठ तुझे गे ओले
लावुनी मुखाला फुटके प्रीतिरसाचे प्याले ?
घोट एकच, शब्द एकच मागत येशी संगें
नुरतां परि लागेबांधे कां लागतेस मागें ?

## संकोच

दूर मागुन उदयगिरिच्या
धूळ उडते अरुणरथाची
शोध चाले निशाप्रियेचा
वेस उजळली प्राचीची

वर्तुलसीमा क्षितिजाची
लंघुन रजनी हळुच पळे
वस्त्र तिचें लज्जारंगी
मागें परि तरल हुळहुळे

धरणी उठली सभोंवता
नजर नेमकी रोंखून
चंद्रमण्यांचा हार तुझा
घेइ निखळला बांधून

पडद्यास कशी खिडकीच्या
आज अवकळा आठवली
सरकुन बाजुस जरा जरा
दिशाच सगळी बोलावली

काळवेळ कसा न जाणे
पहांटचा शीतल वारा
बेशक शिरे सरळ आंत
नसत्या वेळीं निलाजरा

लाजाळूची वल बघे
खिडकीआडुन चोरून
चंद्रमण्यांचा हार तुझा
घेइ निखळला बांधून

वाटेवरतीं पलिकडल्या
वाजुं लागलें पाऊल
त्यांतच व्यत्यय वाढविते
उभ्या जगाची चाहूल

बघ विस्कटल्या रजईची
जरीकिनार उसवलेली
रात्रभराची जागुन कीं
साक्ष द्यावया आतुरली

चंद्रमण्यांचा हार तुझा
घेइ निखळला बांधून
घे कमरेच्या उजविकडे
पदर मोकळा खोंवून !

## तुझ्यासाठीं

तुझ्यासाठीं कुणीं
चाळविल्या लाटा
भिजवियल्या वाटा
वाळूवरतीं

करड्या वाळूंत
कोरल्या मनीषा
उद्यांच्या निराशा
कुस्करल्या

आज भासताहे
सागराचा तळ
मनांतला गाळ
उसवलेला

दर्यांच्या लहरी
झेलुनी पेलुनी
गेला शहारुनी
किनाराही

एकांतीं चढली
डोळ्यांवर भरती
पाउलेंच अडतीं
मागेंपुढें

कौतुकेंच कोणीं
हेलविल्या लाटा
ओलविल्या वाटा
तुझ्यासाठीं

## वळणावर

वळणावर मीं तुला पाहिलें
नकळत सहजच उगाच हंसलें

तुझ्या दृष्टिचा मिळतां मुजरा
लाजुन वळल्या नाजुक नजरा
खोल मनामाधिं तुझ्या शिरावें
प्रीतदीप्तिनें दिल उजळावें
मीलन मधु हें मनांत फुललें
नकळत सहजच उगाच हंसलें

झाली किमया आज कशी ही
नवखी जाणिव उसळे देहीं
आतुरलें मन स्वस्थ न राहे
आंतुन जीवन जळतें आहे
जळजळ करिते लोचन ओले
नकळत सहजच उगाच हंसलें

# चिकित्सा

वा. क्र. 95563
शाखा (स्थळ प्रत)

गालांवरल्या लाल पाकळ्या
एक एक जाहल्या मोकळ्या
वेणीची विणलेली गुंफण
सैल जहाली होतां उसवण

भृंगच अथवा परागांतला
थेंब थेंब मधु प्राशुन गेला
मुग्धपणाचे क्षण ते सरतां
सौख्यदायिनी उरे विकलता ?

किंवा दंश कुणीं नकुलानें
करतांच तीक्ष्ण, तीव्र व्यथेनें
वळवळणारी केशनागिणी
विस्कटली फिस्कटल्यावाणी ?

# तेव्हांपासुन

रसरसलेल्या मोहळांतुनी
कांहिं मधुरसें जें ओघळतें
उषा धरेवर प्रवेशतांना
कांहिं मोकळें जें उधळीते
तेंच एकदां गेलें जेव्हां
ओसंडुनियां तुझिया ओष्ठीं
वृत्ती माझ्या तेव्हांपासुन
तृप्तिविना या दुःखीकष्टी !
मस्ती म्हणतां दृष्टीपुढतीं
नकळत कांहीं स्थिरावतें जें
कधिं अळवाच्या पानावरुनी
खालिं निखळतें रुपें बनुन जें
तेंच एकदां दिसलें जेव्हां
तुझ्या टपोऱ्या बुबुळांमाजीं
तेंच अपेक्षुन तेव्हांपासुन
स्मृती जागते अजुनी माझी !
अनंत आशा हेलावित जें
कधीं विलसतें, कधिं मोहरतें
शीतलतेमधिं चांदण्यांतल्या
शहारून जें कधीं बहरतें
तेंच पाहिलें जेव्हां तुझिया
गळ्याखालतीं जरा खालतीं
उरांत माझ्या तेव्हांपासुन
धृती उसळते ही जळजळती !

## नवता

जडावलेले, कधिं स्वप्नाळू
नेत्र सखे तव कधिं विसराळू
नजर खेळती, खेळविणारी
क्षण हलणारी, क्षण हरणारी
—घन आशय सागरीं
अर्थाच्या घागरी

रोषभरित अवसना पळाचें
त्वेषपूर्ण अवधान बळाचें
अबोल्यांतले बोल बोंचरे
कपोलांतले फुगे नाचरे
—मेघांचा मांडव
तडितेचें तांडव

संचरतां चालींत शीघ्रता
हुंदडते तालांत उग्रता
वारा यथेच्छ प्याली हरिणी
पारा पैंजण झाला चरणीं
—कविता प्रासयुक्ता
नवता बंधमुक्ता

# येणारच जर

घेउन घे ममतेचें हास्य
घेउन ये समतेचें लास्य
तुझ्यांत असुं दे बल सबलेचें
खड्ग असूं दे दल नयनाचें

नवी रीत ये होउन सखये
नव्या युगाचें गीत बनुन ये
तोडुन ये अबलेची नीती
जोडुन मानवतेचीं नातीं

उजळत यइ वीज तळपती
क्रांतिपथावर ध्वजा लहरती
नवसूर्याची बनुन सारथी
येइ उषेसम मशाल जळती

येणारच जर, घेउन ये यश
आशेचेंहि भरलेले कलश
येणारच जर, प्रीति बनुन ये
नावीन्याची मूर्ति सजुन ये

## कांहींतरी

तुझ्या दिलांतुन आहे
दडलेलें कांहींतरी
तुझ्या मनांतुन आहे
म्हणायचें कांहींतरी

निळसटल्या मेघांचे
रंग लोचनीं गोंविले
धुक्यांतले वेंचुनियां
स्वर ओंठावर ओंविले

तुझ्या मूक प्रीतीची
खोल खोल ती गहनता
तुझ्याच गहिऱ्या नजरीं
पुनः हरवते गवसतां

जिभेंत तुझिया आहे
ही कातरता कांपरी
उरीं उसळतें आहे
निलाजरें कांहींतरी

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम ... वि: ... काव्य
... नोंद दि ...

साहजिक :

कधींच गेला सूर्य खालतीं अंधारली धरणी
अन् चंद्राच्या सहवासास्तव आतुरली रोहिणी
अतांच विझला शेजारिल त्या खोलीमधला दिवा
एकाकिनीस मजला येथें हिणवुन हंसते हवा !

नजर :

तुझी नेहमीं नजर दुटप्पी
थेट समोरी अन् तिरपीही
दुसरिकडे वा नक्की मजवर
लक्ष दुहेरी उकलत नाहीं

मला न उमजे आहे वा नच
भाव दृष्टिंत तुझिया भोळा
कारण नुमजे निश्चित कोठें
तुवां रोंखिला तिरळा डोळा !

निमित्त :

रोजच तुम्ही रात्रपाळिला जातां गिरणीमधीं
लग्नापासुन एक रात्रही घरांत नव्हतां कधीं
आज नाहिं का नच गेल्यानें चालायचें म्हणतें
घरीं आज कुणि न दुसरें एकटीच मी घाबरतें !

## शारदेच्या दालनीं

तुझ्या भव्य मंदिरांत विश्व नवें पाहिलें
अधीरलीं येथ माझीं नवख्यापरि पाउलें

काव्यलतेवरी कळ्या
परिसरामधिं येथल्या
परिमलामधिं नाहल्या
मरंद मकरंद मंद समीरणीं दरवळे

सुरम्य प्रांगणीं झरे
सौम्य ज्यांतुन पाझरे
सुगीत भावनाभरें
पावतात वृत्ति येथ शांति, तृप्ति मंगले

ज्ञानामृत भरलेले
कलश इथें सजलेले
भाव तयीं तरंगले
भक्तगणें होत अधिर बिंदु मधुर प्राशिले

तव अधरावर वेणू
ऐकविते राग जणूं
तोषविते अणुरेणू
ललितदूत येथ अमित कणोकणीं विरमले

शब्दसृष्टिच कीं मुळीं
इथेंच आधिं जन्मली
आणि जगांत विलसली
संस्कृतीस येथुनीच जीवन का लाभलें ?

तुझ्या भव्य मंदिरांत विश्व नवें पाहिलें
स्वप्नधुंद मुग्धतेंत ध्यान येथ हरपलें

## चल मागें फिर

मी निघतां तूं माझ्यामागुन
वाटेवरली जशी सांवली
कशास पण ती भलती आशा
फिर मागें तूं याच पाउलीं

प्रेम फुलवुनी जरी चाललों
प्रणयाला परि विसरुन नाहीं
खऱ्या प्रीतिचे लागेबांधे
बांधु न शकती कोणालाही

ज्या आशेनें आलिस इथवर
त्या आशेला तसेंच कवळुन
युगानुयुग तूं जरी राहिलिस
मला न त्याचें कांहीं बंधन

तुझ्यांत नाहीं केवळ माझें
रहायचें कधिं मन रेंगाळत
मत्प्रीतीचीं, आकांक्षांचीं
क्षितिजें नाहिंत गे मर्यादित

चल मागें फिर हेतूंसह तव
उरांत केवळ धरिशी स्वप्नें
मला जायचें कुठें, अन् तुला ?
अश्रूंचीं कां उधळिशि रत्नें ?

## पहिलें स्वप्न

जेथें उमलुन माझें पहिलें
स्वप्न राहिलें अधुरें अपुरें
यावे तेथुन दूत खुणेचे
न्यावे मदीय निरोप सारे

पूर्तीस्तव मी ज्याच्या नित्य
लावुन मागें व्याप घेतले
तें मजला तेव्हांचें अपुरें
स्वप्न पाहिजे पुरें पहिलें

स्वप्नाच्या त्या प्रारंभाला
सखीस ओळख माझी पटली
आणि तिच्या नजरेला माझीं
गोड इप्सितें कळून चुकलीं

तिथेंच पुढचें, तिथेंच पुढचें
स्वप्न राहिलें अर्धें हिरवें
अर्ध्या वाटेवर स्वर्गाच्या
काय अतां मी रेंगाळावें ?

तेथें जाउन येतिल परतुन
एकवार जर माझ्या वृत्ती
होइन स्वप्नाच्या पूर्तीनें
मृत्युंजय मी मृत्यूपुढतीं

अभिमन्यूसम दूरत्वाचे
व्यूह तोडुनी, प्रियासन्निधीं
जाउन वृत्ती घेतिल तृप्ती
दु:खांचे मी प्राशिन जलधी

गूज रेललें जिचिया ओंठीं
आशांनों, जा तिथें सत्वरें
अजून तेथें माझें पहिलें
स्वप्न राहिलें अधुरें अपुरें !

## निर्झरिणी

येथें विजनीं प्रिय रसिकांनो !
विसरा येउनी जग बाजारी
जुलमाचें तें यांत्रिक जीवन
इथें होउं द्या मुक्त क्षणभरी

संसारांतल्या गूढ समस्या
सोडवितांना थांबा थोडे
खडकामध्यें येथ खळाळी
उलगडिते विश्वाचें कोडें

धकाधकीची आदळआपट
कशास करतां स्वार्थासाठीं ?
विमल येथल्या जलबिंदूंवर
तृप्ति तरळते तुमच्यासाठीं

दैनंदिनिंचें जीवन तुमचें
थबके, बिथरे, अडे, विसांवे
इथें अस्खलित परि दिनरात
ध्येयासाठीं जीवन धांवे

पुरे एकही तुषारकणिका
शमवायाला चिरकाल तृषा
एकेका थेंबांत विलसल्या
नव्या युगाच्या नवीन आशा

त्रस्त जिवांचीं सुप्त इप्सितें
अन् प्रेमाची जळती धगधग
हिच्या प्रवाहीं सफल होउनी
क्षोभाचीही विझेल आग

सुखदु:खाची येथ एकता
साधुन, या जीवन रमवा तर
शाश्वततेची वाट दावितें
जिवंत येथिल सलिल निरंतर

## याचक

तिथें तुझ्या परिसरांत
जाइजुई दर्वळे
विभवयुक्त दर्प तूज
धुंदवीत हुंदळे

सौख्यस्वप्न रात्रकालिं
ओंठ तुझे स्फुरविते
दुलई मृदु मखमाली
अंग तुझें झांकिते

दु:खलेश ना कधींहि
तव मनास स्पर्शला
अशुभ असा दिवस एक
ना कधीं उजाडला

संसृतींत नाहीं तुज
शल्य कांहिं बोंचले,
शांत स्वैर जीवनांत
उसळलीं न वादळें

कनकाची चमक झळक
तव मनास झुलविते
महालांतलें वैभव
स्वर्ग तुला दाविते

भरदुपारिं तव दारीं
शिळि शिदोरि याचिली
पदरीं ये क्रोध फक्त
झोळि रिक्त राहिली !

तिथें अचिंत झोंपली
स्वार्थतेंत मत्तता
आणि सदैव मातली
पिसाळून रुद्रता

इथें परी पथारिला
मज भुई न लाभते
जिथें तिथें प्रतारणा
मूक मना जाळिते !

# असुराच्या छातीवरतीं

अनेक अमुच्या परंपरांचें
अमुच्या हातुन श्रेय लुबाडुन
आज मातला महादैत्य हा
पिढ्यापिढ्यांचे लचके तोडुन

सबंध मानवजातीस्तव जरि
अम्हीं काढिल्या अनंत खस्ता
श्रमनिर्मित त्या घडणीचा हा
स्वतःस म्हणवी शास्ता भोक्ता

धनसंपत्ती नव्हेच याची
अमुच्या रक्ताचा तो कणकण
यांचें वैभव नव्हेच याचें
अमुच्या त्यागाची ती उभवण

मृत्यु आजवर निष्पापांचे
हाच घडविण्या निर्दय झाला
मेलेल्यांच्या मुडद्यांवरतीं
चढून भेसुर हास्य हांसला

शमले नाहिंत याचे डोळे
रक्ताच्या चिळकांड्या पाहुन
फुटले नाहिंत कानहि याचे
उठतां किंकाळ्या, आक्रंदन

आज जरी हा खेळ खेळतो
अगतिक अमुच्या आयुष्याशीं
केलें आहे मनगट आम्ही
तप्त शलाका पोलादाची

ऐक्य बाणवुन घेउंच आम्ही
असुराहुनही भेसुर होऊं
क्षितीच नाहीं संग्रामीं जरि
करील तांडव भेकड मृत्यू

होउंच होऊं बलशाली अन्
कृष्ण बनूं या कंसापुढतीं
आणिक नाचूं विजयोन्मादें
ह्या असुराच्या छातीवरतीं !

# जन्म नव्यानें घेई ख्रिस्ता

हे स्वर्गस्था दाविदपुत्रा
देवपित्याच्या मानसदूता !
मानवतेच्या उभारणीस्तव
स्वप्न टांगलें क्रुसावरी तव
त्या स्वप्नासह अवतर आतां
जन्म नव्यानें घेई ख्रिस्ता

ठायीं ठायीं येथ विषमता
सत्तांधांची पाशवि सत्ता
तव जपमाला एका हातीं
रक्त सांडतें दुसऱ्या हातीं
निष्पापांची भेसुर हत्या
जन्म नव्यानें घेई ख्रिस्ता

दाहक तरंग हे रुदनाचे
अश्रु कुणाचे, घाय कुणाचे
तव जखमा त्या येथें दिसती
मानवतेच्या अंगावरतीं
जखमांना कर स्पर्श एकदां
जन्म नव्यानें घेई ख्रिस्ता

समानतेच्या, एकत्वाच्या
तुझ्या घोषणा बंधुत्वाच्या
हवेंत केवळ विरल्या आतां
गस्त घालती स्वार्थ, विषमता
श्रमणाऱ्यांसच सदैव खस्ता
जन्म नव्यानें घेई ख्रिस्ता

ज्यास हवें तें त्यास न मिळतें
जो पिकवीतो त्यासच नुरतें
मात्र प्रयासाविना हवें तें
धनवंतांच्या दारीं पडतें
उलटी गंगा अशी वाहतां
जन्म नव्यानें घेई ख्रिस्ता

युगायुगानें संभवणाऱ्या
दुष्कृतांसही विनाशिणाऱ्या
कुठें राहिलें स्वर्गीय तारण
आणि ठाकलें जिवंत मरण ?
मरणाऱ्याला मृत्युच त्राता
जन्म नव्यानें घेई ख्रिस्ता

तव जन्माची वार्ता घेउनि
लाल येउं दे तारा गगनीं
त्या किरणांच्या किमयेमधुनी
विशुद्धता येउं दे जीवनीं
इथें शाश्वती हवी जीविता
जन्म नव्यानें घेई ख्रिस्ता

मात्र नको ते बायबलाचे
तुझे दाखले जुन्या काळचे
नवीन युग हें, नव्या समस्या
नवतत्त्वानें ये उकलाया
या विसाव्या शतकीं आतां
जन्म नव्यानें घेई ख्रिस्ता

समानतेचे मंत्र हवे नव
तंत्र अन्नवसनाचें वास्तव
कारण पथारिवरतीं येथें
भूक कधींची पोट जाळिते !
भाकरिचा वर मागे जनता
जन्म नव्यानें घेई ख्रिस्ता

जन्म नवा तूं घेतलाच जर
घे श्रमिकांच्या श्रमभूमीवर
मातीमधिं अन् यंत्रांमधुनी
झिजणारे घे आत्मे तारुनि
मग स्वर्गश्री येइल जगता
जन्म नव्यानें घेई खिस्ता !

## समुद्रमंथन

तुझिया सुप्त भावनांच्या मीं सागराला मंथिलें
जें हवें तें अमृताचें रत्न अमोल मज लाभलें

अंतरींच्या अनुरागास रज्जु करून वासुकी मीं
संथ अविचल निश्चयाचा मंदार केला अद्रि मीं

पसरिलास तव भावार्णव तूं मजपुढें मंथावया
बंध सगळे त्वन्मनींचे उस्तरिलेस उकलावया

निष्ठेचे तव पिळुनी कणकण माधुरी मीं प्राशिली
मन्मनाला आस होती जिची कधींच लागलेली

विविध रत्नांच्या प्रभेनें तेजाळला तळ त्वन्मनीं
घेइं रत्नाकर मीं मंथुन प्रीत तेवढी वेंचुनी

तुझिया सुप्त भावनांच्या मीं सागराला मंथिलें
रत्न इप्सित प्रीतीचें तव अमोल मजला लाभलें

# मृत्यु

एकामागुन एक जीवितें
हिममय हातें चुरगाळिन मी
शीतल फुंकर सहज घालितां
शून्यमात्र ही करिन धरा मी !

आयुष्याच्या सीमारेषा
सहजस्पर्शें क्षणांत पुसतों
हृदयांमधल्या सौख्यद आशा
जिथल्या तेथें क्षणीं थिजावितों !

काय थोडकीं हलतींफिरतीं
होत शरीरें कलेवरें तीं ?
काल उभे ते आज धरणिला
होत आडवे, केवळ माती !

वातावरणीं कुठुन हवा ही ?
धरतीवरती धूळ कशाची ?
जे विरले निःश्वास, हवा ती
धूळ दाटली आकांक्षांची

चराचराला चाळविते नित
चाहुल माझ्या छायेचीही
जाणिवेसही ऐकूं येते
पदापदाला माझिच ग्वाही

एकदिनीं तर होउन जगतीं
काळावर मी कायम आरुढ
जालिम हाणिन अखेर काळे
जीवितपुरुषावरतीं आंसुड !

नच जाणे वा कालांतरिं मज
प्रबलत्वें प्रतिसारिल मानव
मर्त्य जरी तो असे संप्रतीं
मानवजाती अमर सदैव !

मजवरतीं जर उठेल खवळुन
मानवजाती शाश्वत नश्वर
यंत्रयुगीं या दीर्घ प्रयत्नें
करील मनुजा अमर्त्य अजर

' मृत्युंजय तो शक्त उद्यांचा '
शल्य हेंच नियतीचें बोंचे
अंतक मी परि ममेव अंत
दिसतां मीपण मलाच जांचे !

## ओढ

तुझ्याचपाशीं सौख्यान्वेषी
वृत्ती माझ्या नवथर नटल्या
तुझ्याचपाशीं मुग्धतेंत अन्
स्निग्धतेंत त्या यथेच्छ फिटल्या

प्राशियलें सौंदर्य तुझें मीं
अनुभविलें नावीन्य निराळें
सौख्य लाभलें, कीर्ति, काव्यही
तुझ्यांत मजला सर्व मिळालें

इप्सिताचिया परिपूर्तीचा
मोद मनाला व्यापुन राहे
हवेंहवेंसें कांहिं नुरे परि
ओढ तुजकडे अजून आहे !

## विरहिणी

नाजुक नातीं स्निग्ध रेशमी झालीं आज निकामीं
अतांपासुनी खय्यामाची सुरई पडे रिकामी

मंजुळ तारा छेडुन आतां दूर दूर तूं जाशी
वाऱ्यावरतीं पंख लावुनी अनोळख्या आकाशीं
विरहाची सारंगी राहिल छेडित राग स्वतःशीं
आवाजाच्या लहरींवर परि कशा निवाव्या ऊर्मी ?

नकळे कैशी मधु प्रीतीची एकसंधता तुटली
आकांक्षांचा मिनार माझा कोसळला खालीं
नव्या उमलत्या पाकळ्यांतली उडून गेली लाली
यावें माझ्या वंशा तेव्हां रुतती कांटे वर्मीं

काय जगामधिं असेच विरती वाऱ्यावरतीं सगळे
घुटमळलेले दिलामनाचे व्याकुळ श्वास उमाळे ?
कशास विणलें माझ्यापुढतीं मोहाचें मग जाळें ?
जा ही घेउन आठवणींची दुनिया अंतर्यामीं !

## पहिला पाऊस

मी पहिल्या पावसांत आज
अश्रूंच्या धारांत नाहतें
मागिल पहिल्या पावसांतली
भेट तुझी उरिं उलत राहते

निसर्ग उडवित जल प्रणयाचें
भिजवुन धरणिस रुसवित आहे
मुग्ध विरहिणी उदासिनी मी
विरस मनांतुन उसवित आहें

परि दिधले तूं अनुभूतीचे
अपूर्व सौख्यद जे कांहीं क्षण
तीच तेवढी अल्प कमाई
उजळिल मम देहाचा कणकण

सरेल पाउस सरतां वर्षा
मजसम होइल उदास धरणी
उष्ण उसासे तिचे नि माझे
सर्वच विरतिल वातावरणीं

रात्रीं विरहाच्या अंधारीं
वसुधा पडेल काळीशार
आकाशांतिल आणि दिव्यांतिल
ज्योती देतिल तिजला धीर

माझें जीवन जरि तिमिरांकित
मज कांचेचे दिवे कशाला ?
सारित वाती ठेविन जळते
तुझ्या स्मृतीचे दीप उशाला !

## ताजमहाल

शुभ्र शिलांच्या थरांखालतीं एक चिमुकलें
सौंदर्याचें निधान निजलें
बादशहानें श्वेत प्रस्तरीं केली मुद्रित
यमुनातीरीं केली बिंबित —
प्रियतमेचिया कायेवरली कांति गुलाबी
मुख–नयनाचें लास्य शराबी

चिरस्मृती ही व्यक्तिसुखाची, रूपवतीची
प्रणयप्रियेची रतिराज्ञीची
स्वार्थ जाणतो अन्य न सुंदर, परि मुमताज
स्मृत्यर्थ जिच्या हा हिमताज !
धवल मनोरे चारि दिशांना जेविं दीपिका
स्वार्थाच्या कीं भव्य पताका !

आणि कुठें श्रमिकांच्या हो कांहिं निदान खुणा
झिजले जे करतां ही रचना ?
जयें ओतिली श्रमप्रीती अन् कलाप्रेम तें
त्राण, प्राण लावुनी पणातें
वीस सहस्र श्रमजीवींची कुठलि निशाणी ?
कुठें स्मृती अन् कुठें कहाणी ?

निर्मिलें जयें अठरा वर्षें संतत राबुन
सर्वश्रेष्ठ हें शिल्पनिधान
त्यांच्यास्तव ना खेद–शोक, ना कांहिं बांधणी
नाहिं गीत वा स्तंभ हिमानी
जीवितसौंदर्यांचा त्या नच शहास आठव
जीविता त्या जणुं नव्हतें नांव !

प्रतिक कशाचें ? रसिका उरतो सहज सवाल
दृष्टि हरपितां ताजमहाल
रसिक प्रेक्षका ! स्मृती जाण ही शुद्ध कलेची
श्रमप्रेमाची, मानवतेची
विरचकांच्या अमर स्मृतीला आणि कृतीला
सादर अर्पुन जा सुममाला !

## घरकुल

... स्वक्रम०
जा० क्र० ... १.८.३२.. नों० दि० ...
मराठी ग्रंथ संग्रहालय
दा. क्र. १५५८३
ग्रंथ शाखा

घरकुल माझें इवलेंसें हें
मानस यांतुन जागत राहे
उरिं आशेची जळते ज्योत
हो चंदेरी अवघी रात

सप्तरंगिणी ध्वजा आरुणी
इंद्रधनूची आकाशांतुनि
रंग अंगणीं देते उधळुन
जीवनदालन जातें उजळुन

सीमारेषा क्षितिजावरल्या
असीम होउन इथें मिळाल्या
आकांक्षांच्या असंख्य ऊर्मी
होत अनावर अंतर्यामीं

उदासता ना काळी अपुली
धजते धरण्या कधीं सांवली
दुःखाचा गारवा जरासा
जाणवतां दे ध्येय दिलासा

आपत्तींच्या मेघांवरतीं
प्रहार करण्या सदा विजेती
दिलांत दडली प्रतिकाराची
लखलखती समशेर विजेची

वसन तमाचें नेसुन श्यामल
जधीं निराशा चोरित चाहुल
व्योम मनाचें व्यापुं पाहते
शुक्र चांदणी उदया येते

उषा विलसतां निशा न उरते
धुकें धुरासम पळतें विरतें
आणि दृश्य हो वाट समोरीं
अखेर जी ने इष्ट किनारीं

## स्वप्न पडावें

दुरुन अकल्पित झंकारित तार हवेची
मधुर लकेर यावी थरकत संगीताची
तशि घेउन कांहीं जाणिव अंतर्यामीं
तूं सहज अनामिक आलिस माझ्या धामीं

मुग्ध मोहरलें तव सुमदलासम हास्य
जिवणीवर नवकाव्यांतिल गहन रहस्य
धडपडतां शब्दांस्तव तव वाचाविनय
अडखळला नवखा पहिल्यावेळीं आशय

तव अमल लोचनीं भाव तरळला लीन
जणुं नितळ जळावर चपळ तळपला मीन
आणि भासलें तेज तुझें कांहिं निराळें
मज आजकाल जें नाहिं कुठेंच गवसलें

तूं विचारसुंदर उघडुन अंतर अपुलें
तिथ चित्र उगवत्या दुनियेचें दावियलें
श्रद्धा तव जीर्ण जगावरली सरलेली
अन् आस उद्यांची उरांत तव उरलेली

येणारें युग तुज हवें हवें वदलिस तूं
जीवन नव नेणार नव्या वळणावर तूं
दृश्य मनीं अभिनव संसाराचें सजलें
तव नजरें उद्यांच्याच उजेडांत उजळलें

न काळची, न आजची, तूं परी उद्यांची
नवोन्मेषशालिनी नवोद्गामिनी प्राची
तूं तर ती भविष्यांतली मला हवीशी
शिल्पकार मनांत कल्पी प्रतिमा जैशी

हें असें कांहिंसें, निजतां शांत धरित्री
मज स्वप्न पडावें कधिंतरि एके रात्रीं
अनकल्पित अवचित मिळुनी समा समेशीं
हें सुफलित व्हावें कधिंतरि एके दिवशीं !

## याद् जळत राहिली

जीविताच्या दोन वाटा दो जणांच्या एक झाल्या
छायेस छाया देत साथ नजीक आल्या सांवल्या
आणि निवळुन ऊन मधलें दूरतेचें दूर झालें
जीवनाला साथ आली, साद आली, नाद आले

हंसलीं परी या जगाचीं रूढ नातीं, गूढ शास्त्रें
नग्न भीषण नृत्य करीत नीच उठलीं नीतिशस्त्रें
या भुतांनीं प्राण नेले मनिषांचे नि भावनांचे
मिळुं दिले नच मुळीं श्वासांत तिचिया उच्छ्वास त्याचे

संगतीचा भंग झाला, रंग गेला जीवनाचा
शल्य उरलें वेदनेचें, अर्थ निवला जाणिवेचा
विरहाचीं नि दूरतेचीं उन्हें पुन्हां तीं तापलीं
ती साद विरत चालली, परंतु याद जळत राहिली !

## बदल

येतां सुसाट झंझावात
   झपाटल्यागत चळलीं रानें
अन् वठलेलीं देंठांपासुन
   वृक्षांवरलीं गळलीं पानें

गिरक्या घेउन अलगद खालीं
   जणूं जीर्णता झाली गोळा
काळाच्या पावलांखालतीं
   चुरून विरला तो पाचोळा

नवी पालवी शाखांवरतीं
   हिरवी हुळहुळते नववसना
स्वयंगतींतुन स्वत:स बदलित
   निसर्ग करितो नवीन रचना

## आलिस पुन्हां

आलिस पुन्हां उगीच परतुन
त्याच जाणिवा, तींच आर्जवें, उरांत वणवे तसेच घेउन!

तरल निळया स्वप्नांची सृष्टी
तुझ्या पापणीखालीं विलसे
चाल निघे जणुं दिगंतराला
अधांतराला घालित वळसे
मरगळलेल्या मनोगतांना पंख पऱ्यांचे नाज़क लावुन
आलिस पुन्हां उगीच परतुन

आर्द्र, आर्त जरि तुझीं आर्जवें
आणि आंसवें नयनीं स्नेहल
हरिणीसम परि कातर अंतर
जागृतींतही केवळ स्वप्निल
अबलत्वाच्या रुळलेल्या त्या परंपरेला आजहि घेउन
आलिस पुन्हां उगीच परतुन

तुजपाशीं जर जाणिव म्हणुनी
असेल सोनें उरलें कांहीं
अनुभूतीची आगच नसतां
बावनकशी उतरलें नाहीं
त्याच उणीवा आणि नेणिवा कल्पनेचिया कवेंत कवळुन
आलिस पुन्हां उगीच परतुन

जीवन जगतें जामिनीवरतीं
दाह सदाचा तळपे माथीं
तुझी जमिन परि जगावेगळी
मनिषांचे नच वणवे जळती
अवास्तवाचे, आभासांचे अंवतीभंवतीं मिनार उभवुन
आलिस पुन्हां उगीच परतुन

# इशारा

दंभाच्या चिखलांत खोल सडणाऱ्या दैत्यांनो
अन्यायबलें सत्तेवर चढलेल्या वैऱ्यांनो !
हा एकमुखी दशदिशांतुन अखेरचा इशारा !

तुम्ही चिरडतां होउन निष्ठुर
आशांचे नव फुलते अंकुर
नवयुगाचे परि पाइक शूर
देति झुंज जरि जळे जीवनीं संतप्त निखारा

जीर्णामागें दडुनी दानव
स्वार्थास्तव तुम्हि करितां तांडव
नवा परि जन्मताहे मानव
नवजगताचा तोच नियंता, तुम्हां कुठें निवारा ?

गतकालांतिल जे तुमच्याहुन
बलिष्ठ उठले जुलमी माजुन
अखेर मातींत गेले मिसळुन
शतकांच्या त्या इतिहासाला जा आज विचारा

स्वतंत्र शक्तीचें हें वादळ
तुम्हांसवें, घेउन ईर्ष्याबल
झगडत आहे, झगडत राहिल
मृत्युंजय चैतन्यावर शस्त्र खुशाल उगारा

नव्याजुन्याचें अखेर हें रण
जीर्ण जगाचे अखेरचे क्षण
कुजका सडका राहिल ना कण
फुंकरील जीर्णावशेष सर्वच तुफानवारा !

## झडेल नौबत

अवघडलेल्या सुप्त भावना तप्त होउनी
लाख लाख ते लाल उगवते बनतिल सूर्य
प्रकाश गिळुनी दीर्घ पहुडल्या कालनिशेचा
गर्भ फाडुनी उदेल दीप्ती पिऊन धैर्य

जरा गिळूं द्या गुप्त शक्तिना शोधकतेची
सजीवतेची स्वत्वाची ती एक चेतना
जरा मिळूं द्या लुप्त युक्तिना योजकतेची
अदम्यतेची अशाम्यतेची एक प्रेरणा

फुलें हांसरीं, कळया उमलत्या सुगंधासवें
ओतितील मग आसमंतांतुन आग आग
पर्णें दुधारी बनुन विखारी परजतील खड्गें
आद्य युगाची दिसेल किमया जागोजाग

तदा पिशाच्चें वेडिवांकडीं कोणी नाचत
पिसाटल्यागत उकरित उठतिल जुना उकिरडा
बुरसटल्या जगताची करतिल जागत जपणुक
आयुधयुक्ता युगदेवीशीं करतिल झगडा !

कुठें उदेल्या शक्तिपुढें तो मूर्ख काफला !
दिवाभितें तर अंध व्हायचीं सूर्यापुढतीं !
काय तुमुल तो अंतिम संगर अंतिं खेळण्या
धजतिल वेडे धगधगणाऱ्या आगीपुढतीं ?

धजले तरिही प्रथम सलामी विजेसारखी
चमकुन त्यांच्या चक्रव्युहाचा छेदिल गोफ
आणि अखेरीं उभ्या तयांच्या तांड्यापुढतीं
एका अवसरिं झडेल नौबत, उडेल तोफ़ !

# अशाच एका सायंकाळीं

उंच माड हे माथा झुलवित
धुंद उभे मदनासम विचलित
दूर लांबल्या स्तब्ध सांवल्या
आणि झांवळ्या चळल्या कलल्या
अवचित अपुली भेट जहाली
अशाच एका सायंकाळीं

संध्या चालत रेंगाळत ती
असेल तिचिया वाटेवरतीं
दिवसयामिनी जातिल बोलुन
क्षणभर होतां त्यांचें मीलन
थरकत अपुलीं मनें मिळालीं
अशाच एका सायंकाळीं

सभोंवतालीं आतां धरणी
आरामाचीं म्हणेल गाणीं
चाळिल पानें गतकालाचीं
कधींमधींच्या आठवणींची
जाग स्मृतींना अपुल्या आली
एकाच एका सायंकाळीं

अशाच व्हाव्या भेटीगांठी
मनें जुळावीं जुळल्या ओंठीं
नवसौख्याच्या बरसातींनीं
दिलें निघावीं दोन न्हाउनी
हेंच बोललें तुझियाजवळीं
अशाच एका सायंकाळीं

आज परंतू या संध्येला
या माडांना, या धरणीला
नंतरचें तें माहित नाहीं
अंतर मधलें ठाउक नाहीं
तिथेंच अपुली प्रीत संपली
अशाच एका सायंकाळीं !

## नाहीं अजुनी

चितारिलें मीं तुझें जिवंत
चित्र साजिरें मनिं माझ्या
कल्पनेंतल्या रेखिवतेंतुन
तरल रंगल्या छटा तुझ्या,
तुझेंपणाच्या रितेपणाची
माझेंपण साहतें व्यथा
स्वत:विना एकाकीपण हें
कुणास ही सांगेल कथा ?
नेणिवेंतली जाणिव माझी
न कळुनही कळतीं नातीं
श्रद्धेंतुन मीं सृष्टिंत माझ्या
स्पष्ट उभविली तव मूर्ती
—नाहीं अजुनी परंतु तुज मीं
कधीं पाहिलें डोळयांनीं !

झुळुक ही यौवनाची वेडी
सभय सहज मी हादरतें
निराधार वाढती वेल मी
शीत शहारे आवरतें,
मनांत येतें, मनिषा माझ्या
सर्व तुला कळुनी याव्या
जीवन-वाटा माझ्या तुझिया
अवचितशा मिळुनी जाव्या,

तुझ्याच लोभस आभासावर
रेंगाळति माझ्या नजरा
तव प्रतिमेच्या सौंदर्याला
रोज मिळे माझा मुजरा
—नाहीं अजुनी परि हें तुज मीं
कधीं कळविलें शब्दांनीं !

## ज्ञात आहे

जगायचें कसेंतरीच
आशेच्या बुधल्यामध्यें
काय आहे कोण जाणे
झांकलेल्या मुठीमध्यें

स्वार्थाचिया फत्तरांचें
उभें भिंताड सभोंवतीं
चुन्यासंगें आंत याच्या
चिणलेले परि जीव किती

भिक्षेच्या करवंटीला
तीन भोंकें उपेक्षेचीं
दातृत्वास अन् फणेरी
लाख नखें निवडुंगाचीं

अर्धमेल्या पोटांतल्या
जखमेंतुनी धार वाहे
वांकडी तीक्ष्ण खुपलेली
गिधाडाची चोंच आहे

हें सगळें अनुभवतांना
ताप चढतो जाणिवेला
हेंच सारें साहितांना
उधाण येइ अस्मितेला

तापास या माप नाहीं
बांध नाहीं उधाणाला
अमाप, अबंध उलणारा
रस पृथ्विच्या गर्भांतला

मूठ आहे भविष्याला
या रसाची तावलेली
ज्ञात आहे आज नियती
मुठीमध्यें झांकलेली

## कैफियत

आकाशाची निळाई
डोळ्यांत सांठवून
तूं पाहात होतास
कौतुकानं माझ्याकडे ...
स्नेहल तुझ्या त्या नजरेनं
विव्हळ माझ्या मनाला
जिव्हाळा दिला होता
नव्हाळीचा,
जळत्या हृदयाला
शीतलता दिली होती
लिंबोणीच्या सांवलीची,
उदास अंतःकरणाला
दिला होता दिलासा
भावस्पर्शाचा,
थिजलेल्या रक्तालाहि
दिली होती गति
उष्ण उष्ण !

आठवतो का तो दिवस
चैत्राच्या सुरुवातीचा ?
लक्षांत आहे ती वेळ
दिवेलागणीची ?
आठवते ती जागा

आभाळाखालची ?
नाहीं आठवत ? वाटलंच मला
नको असेल तुला
झाल्यागेल्याचं स्मरण !
आज तुझी वृत्ति बुजली आहे
पण माझी स्मृति रुजली आहे
खोलवर मनाच्या
ओलसर मातीमध्यें,
आज तुझी भावना निजली आहे
पण माझी संवेदना सजली आहे
आवेगाचा नि आवेशाचा
शृंगार करून

तें आकाश, निळाई, कौतुक
ती नजर, तें विव्हळणं
तो जिव्हाळा, ती नव्हाळी...
आज मला हवी आहे
उद्यां मला हवी आहे
रोज मला हवी आहे !
लिंबोणीचा गारवा
स्पर्शांतली उष्णता
पाहिजे आतां
पाहिजे दरक्षणीं !

माझ्या गव्हाळी गालाच्या
इवल्याशा खळीमध्यें
सगळं ना तुला सांपडलं होतं ?
आणि तुझ्या उघड्या मानेवर
माझं इप्सित नाहीं का पहुडलं होतं ?
खळी आज खुळी होऊन
पळाली आहे
मी माझं इप्सिताचं गांठोडं
खांद्यावर घेऊन आलें आहें

आकाशाची निळाई
डोळ्यांत सांठवून
तूं पाहात होतास
कौतुकानं माझ्याकडे ...
कोरलं आहे मीं तेव्हांचं तें दृश्य
माझ्या मोगरी डोळ्यांच्या
लोंकरी पापणीखालीं
चोरलं आहेस तूं माझं प्रणयसंचित
ठेवून मला वंचित
अवहेलनेच्या वाटेवर

फुंकर घाल तुझ्या आठवणींना
हुंकार दे तुझ्या भावनांना

आणि सांग
आठवतो का तो दिवस
चैत्राच्या पालवीचा ?
स्मरते का ती वेळ
शिणलेल्या सांजेची ?
आहे लक्षांत ती जागा
पायांखालची ?
तेंच तेव्हांचं सारं सारं
मला हवं आहे
आतां
नंतर
तदनंतर
निरंतर !

## उन्मेष

सौंदर्याच्या तुझ्या बनांतुन
मम धुंदीचा नाग झुलावा
विळखा घालुन मज्जेभंवतीं
लज्जेला तव दंश करावा

अंश नसावा तुझ्या मनांतुन
भीतीचा वा विकल्पिताचा
अकल्पिताची मेख आगळी
भावहि भोळा अजाणिवेचा

उणें दुणें तूं बोलुन घ्यावें
मानावें मीं मुळीं न किल्मिष
घडायचें तें असेंच घडतें
असाच असतो हा उन्मेष

तुझ्या डिवचल्या नजरेमध्यें
राग दिसावा, रगहि असावी
कमरकण्यांतुन कळ उठतांना
तव नेत्रांतिल आग निवावी

शिणल्या निःश्वासांनीं जावें
वायूवरतीं विरून नंतर
मी तुजला अन् तूंही मजला
दूर होउनी विसरुं हवें तर !

## गुलाल आहे इथली माती !

माय मराठी, हिच्या ललाटीं वैभवरेषा चिरजयवंती
ज्वलंत आहे इथें अस्मिता, गुलाल आहे इथली माती !

रुधिर शिंपिलें उदार होउन, मदार त्यांची स्वातंत्र्याला
संगर खेळुन डोंगरदरीहि साक्ष ठाकली गतकालाला
विजयोर्मी सरितांच्या घेती यथास्वैर आवेशांत गती
स्मृतींत आहे धृती उसळती, गुलाल आहे इथली माती !

हृदयीं जागे शूर शिवाजी, मनें मराठी पोलादाचीं
तृणांत आहे घृणा अजुनही प्रपातापुढें नत होण्याची
परंपरा शतकांची मागें श्रेय राखण्या उभी जागती
मावळभूमी केवळ स्फूर्ती, गुलाल आहे इथली माती !

उरांत अरिच्या निर्घृण कीं घण वातावरणीं येथिल कणकण
राळ रगाची खळाळणारी चराचराच्या शिरेशिरेंतुन
अन्याय ठरे अक्षम येथें न अक्षय मृत्युस कांहीं क्षिती
नित्य धरी तृण दास्यहि दातीं, गुलाल आहे इथली माती !

कठीण कणखर कणा सह्याद्री, उणा न पडला सामर्थ्याला
खुणा मिरवितो पराक्रमाच्या, तुरा झुलवितो माथ्यावरला
मराठमोळी जनता भोळी, ईर्ष्येचा परि पलिता हातीं
निधडी आणिक उघडी छाती, गुलाल आहे इथली माती !

## ओघळलें रक्त जिथें

खोल मानवी जित्या मनांतिल
अपार्थिव जाणिवांचीं स्वप्नें
तेजोमय बलिदानामधुनी
विखरुन पडलीं मौलिक रत्नें

अजुन झळकतात तिथें
ओघळलें रक्त जिथें

संगिनींतल्या निर्दय गोळया
घेत निघाल्या निर्वंध बळी
खच देहांचा छिन्नविछिन्न
रचीत शस्त्रें स्वैर नाचलीं

आस परी अमर तिथें
ओघळलें रक्त जिथें

जुलमासंगें चीड झुंजली
चिरसत्यास्तव मानवतेची
त्यागांतिल निर्धार मोजितो
अपार अस्मानाची उंची

उरलें परिमाण तिथें
ओघळलें रक्त जिथें

सत्तांध माजल्या क्रौर्यानें
जीवितमूल्यें जरी तुडविलीं
अन्याय्य आसुरतेपुढतीं
प्रतिकाराची लाट उसळली

गर्जे आव्हान तिथें
ओघळलें रक्त जिथें

वीरश्रीचें विरक्त सिंचन
भवितव्याला चढवी लाली
हौतात्म्याची शेज शोभते
धूळ धरित्रीची भिजलेली

स्मारक भूमींत तिथें
ओघळलें रक्त जिथें

## विसांवलेला घाट

घागरीच्या कवेंतच
 विसांवलेला घाट
प्रतीक्षेच्या डोळ्यांना
 विस्मरलेली वाट

उमटणारीं वाटेवर
 पाउलें तव हरवलीं
आस माझी क्षणवेडी
 तिथें आज अवघडली

एकांतिंचा सांकेतिक
 अर्थ बुडे पाण्यांत
घाट निरर्थक कोरडा
 मुका बसे उन्हांत

कितीकदां लचकतांना
 प्रीतीच्या कमरेवर
कांच-कांठीं ओंठांच्या
 डुचमळली तव घागर

जिरुन गेलें पाण्याचें
 तुझ्या घरांत निमित्त
दिलहि मुरलें वेळेचें
 माझी वाट पहात

प्रतीक्षेला आज तुझ्या
        ही दशा विरक्तीची
ये अवकळा आणि तुझ्या
        घरास माहेराची !

घागरीच्या कवेंतच
        विसांवलेला घाट
प्रतीक्षेच्या डोळ्यांना
        विस्मरलेली वाट !

## आंकडेमोड

गोलचकोरी वळवेणीच्या बुचड्याला तूं
खोल खुपसले घट्ट बोंचरे पांच आंकडे
तेल प्राशुनी तकाकणारी रग केसांची
जिरवित रुतले कांहिं फांकडे, कांहिं वांकडे

मीं मोजावीं तव नजरेंतिल गरगरणारीं
शून्याकारी लाख वर्तुळें मुकीं-बोलकीं
प्रणयामधल्या अधिक-उण्यांची वर्तुळांत त्या
शून्यानें जणुं अखेर सगळी उरली बाकी

अबोल रुसवा, आशय फसवा अधलामधला
भागुनियां दोघांनीं जावें पार विसरुनी
धुसळ्यामुसळ्या अंगलटीचा ढंग गुणावा
तंग तुझ्या या चोळीवरल्या निळ्या फुल्यांनीं

हीच आंकडेमोड पुढें मीं पुरी करावी
अंबाड्यांतिल सर्व आंकडे मोडुन टाकुन
अन् खुपसावीं तिथेंच माझीं पांची बोटें
लांबमोकळ्या सैलकुरळ्या तव केंसांतुन

## तुला नकळत

भीडखुळ्या अबोलिला
आजच सुचली बोली
लाजरिच्या फुलकळीस
लाजहि आजच आली

रोजची ग चाल तुझी
तालच आज विसरली
जाणिवेंत तव लकेर
नवी अखेर मिसळली

डोळ्याच्या पापणिची
कड थोडी जड झाली
नजरेसहि गिरकीची
भिरभिरती तड गेली

मिटलेल्या शब्दांनीं
उघडियले ओंठ जरा
शिवलेल्या अर्थाची
विस्कटली गोठ जरा

झुळुक आज चुळुकभर
प्याली हळुच गारवा
कण ओला मातीचा
अंकुर ये वर हिरवा

शैशव तव आज सरे
साज नव्याचा उमदा
तुझें तुला नकळत ग
वर्ष संपलें चौदा !

## आज अकल्पित

ती तेव्हांची
आज कशाला खुळी आठवण
मनोव्यथांची
नको उशाला शिळी सांठवण...

जेव्हां झुरला
वाऱ्यामधला खुलता सूर
आणि उतरला
वेळुबनाचा झुलता नूर

हिरमुसली ती
वळणावरली दाट सांवली
पाहुन शिणली
भर उन्हाची वाट आपुली

चंद्ररसानें
प्रणय पुरेसा भिजला नव्हता
संकोचांतिल
विनय जराही थिजला नव्हता

स्वप्नपऱ्यांचें
भानच नुकतें सुटलें होतें
आकांक्षेला
पानच नुसतें फुटलें होतें

तेव्हांची ती
नकोस उलवूं जाणिव दुखरी
विस्मरणाची
नकोस उसवूं वीण लोंकरी

गतकालचे
नको मोजणें क्षण खळलेले
अनुभूतीचे
नको वेंचणें कण गळलेले

किती दिसांनीं
राग नियतिनें गिळला आहे
आज अकल्पित
योग भेटिचा जुळला आहे

## तारा थबकला आहे

बेथलेहेमच्या आकाशांत
प्रकाशाचीं लक्ष लक्ष
सोनफुलें फुललीं आहेत,
लखख लखख अहेवलेणीं
हर्षवेड्या यामिनीच्या
अंगावरतीं खुललीं आहेत,
जोसेफ-मेरीच्या पावलांनीं
नाझरेथहून अनवाणी
अव्याहत चालत येऊन
इथें पाऊलवाट संपली आहे,
आणि मानवाची यापुढली
प्रलयकालच्या क्षणापर्यंत
नियतीमधील प्रदीर्घ वाट
अव्यक्तांतच लपली आहे !

दाविदकुलमणि श्रीयेशूचा
गव्हाणींत इथें जन्म होउनी
नवनवलाई शहारलेली,
महत्ता ही विश्वव्यापी
इवलेंपण घेऊन तृणाचें
इथें तृणावर अवतरलेली,
युगायुगांच्या महाव्यथेचा
मुक्त झाला निःश्वास येथें

अश्रुत अनुक्त निःशब्दाचा
व्यक्त झाला विश्वास येथें,
ईशबालकाचे लुकलुकते
तेजाचे रविचंद्रच नुसते
अनघ निरागस डोळे निर्मम

ज्यांना नंतर दिसलें पुढतीं
लहानग्यांच्या इवल्या नेत्रीं
स्वर्लोकींचें राज्य मनोरम...

प्रचीतीच ही गूढत्वाची
दानिएलच्या भविष्याची —
" सप्तशतकें आजपासुन
व्यक्तस्वरूपीं अव्यक्तांतुन
तारणकर्ता विश्वनियंता
मानवतेचा दुरितनिहंता
सर्वसमीक्षक ज्याची प्रज्ञा
' एमानुएल ' ज्याची संज्ञा
पृथ्वीवरतीं घेइल जन्म
मम शब्दांचें कळेल मर्म ! "

या उक्तीची शक्ति अमर्त्य
सिद्ध कराया सुप्त अतर्क्य
दिव्य घडलें दानिएलचें
निचिन्त अभयानें जगण्याचें

क्रुद्ध सिंहांच्या जबड्यांतुन
क्रूर मृत्युच्या दाढेखालुन !
अघटितसूचक अशीच होती
यहुद्यांसाठीं भविष्यवाणी
इसाईआच्या जिव्हेवरली
जीस्तव त्याच्या जितेपणांतच
शरीराचीं तर शकलें झालीं
करवतीच्या दांतांखालीं !

सत्य-शिवाचा प्रत्यय येतां
असत्य आज भेदरलें आहे
अधिसत्तेच्या थिजून जिगिषा
रोम-साम्राज्य हादरलें आहे,
या नगरीच्या माथ्यावरतीं
एक तारा थबकला आहे
या वार्तेची लागुन चाहुल
हेरोद पुरा हबकला आहे !

## नवप्रभात महाराष्ट्राची

प्राचीची नवरंगी माया मावळभूवर थयथयते
नवप्रभात महाराष्ट्राची जयघोषानें दुमदुमते !

अभंग आणिक समर्थवाणी
जिभेंत झरते झांजरकालीं
किरण-वायुच्या लहरींवरतीं
डुले आरती अन् भूपाळी
शिवरायाचें निशाण भगवें मनांत अवघें फडफडतें !

होनाजीनें माळ-पठारें
उभीं शिवारें नित चेतविलीं
संत जनाई, ज्ञानेशांनीं
भक्तीची जपमाळ ओंविली
ती ओवी तर पदर खोंवुनी अजुनी जात्यावर दळते !

कूस जियेची रत्नखनी ती
सह्यमाउली काळी हिरवी
श्वसनामध्यें विशाल समता
दिलांत ममता कणखर कडवी
उचंबळुन वत्सलता आजहि दहिंवरांतुनी गहिवरते !

वीज वाहते वीरश्रीची
इथें तापल्या धूलिकणांतुन
शूरत्वाचे सूर गर्जती
कोटि मराठी मनामनांतुन
अन्यायावर या जनतेची झेंप वाघिणीची पडते !

## या मातीला चढे रक्तिमा

शतशतकांचीं यशःपूर्तिचीं तुला महाराष्ट्रा वरदानें
दिशादिशांनीं साज चढवुनी आज उधळिले घे नजराणे

प्रताप शिवबांचा आठवतो, स्मृतीस उजळी तेज मावळी
तृणपर्णांनीं, वनकाष्ठांनीं तरवारीची धार प्राशिली

जिगिषाप्रेरित वायुगतीनें अश्व दौडले दरीकड्यांतुनि
पाषाणांवर इथें निशाणी त्या टापांची खुलते अजुनी

जागृत निष्ठा, अमर प्रतिष्ठा समर झुंजली स्वत्वासाठीं
जुमानिला नच जुलुम अमानुष एक मराठी मुलखासाठीं

तुफान उसळे जनशक्तींचें, या मातीला चढे रक्तिमा
मराठमोळ्या महामानिनी ईर्ष्येलाही नुरली सीमा

धुळींतुनी आव्हानें उठलीं, हटली दुष्टांची शिरजोरी
उभी ठाकली छाती निधडी निर्दयता पचवुनी आसुरी

सत्ता, मत्ता शरण आणिली, यश घेई लोळण चरणांवर
कडाडतां आसूड विजेचा कोसळला पर्जन्य धरेवर !

# माझी खोड

एक माझी खोड ऐशी कीं जगाची ओढ मजला
वेड ऐसें वेढणारें पीडलेल्या या जिवाला
आसक्तिचा शाप लागे, व्याप मागें अपेक्षांचे
अतृप्तीची खाण उदरीं, दान पदरीं उपेक्षेचें
घाम आणिक अश्रु यांहुन मोल मोठें दहिंवराला
आणि तरिही खोड माझी, या जगाची ओढ मजला

नित्य भंवतीं भावनांचें निर्वेध चाले कांडण
जीविताच्या मांडणीशीं काळ मांडी भांडण
सफलतेची ना उपाधी, नाहिं व्याधी वा सुखाची
विघ्न गेलें भग्न होतां मुग्ध स्वप्नें मग्नतेचीं
पदीं कधीं ना मार्ग थकला, स्वप्नांतही ना स्वर्ग दिसला
आणि तरिही खोड माझी, जीविताची ओढ मजला

धुंद आहें हुंदक्यांच्या मी पिऊनी मूक वेणा
भूक छेडी आर्ततेनें आंतड्यांची रुद्रवीणा
दुःखाचेच घांस घ्यावे, आस मम ही भीडभोळी
ही उरे मम खोड जोंवर प्राणांची ना कीड मेली
खोड परतू ही जित्याची, येइ रितेपण जितेपणाला
मरणांतरींही पछाडणारी जिविताची ओढ मजला

## मीच किनारा

वायुसागरांतुनी निघालिस
आभाळावर भुरळ दाटली
अथांगतेचा थांग हरवला
अन् लहरींना भरती फुटली

घेउन आलिस नवलाखाचा
दिमाख डुलत्या डौलामधुन
यौवनशाली गलबत आलें
जरिपदराचें शीड उभारुन

इथें शोधिला माझ्या श्वसनीं
निःश्वासांनीं तुझ्या निवारा
क्षितिजें विरुनी अवनीवरलीं
उरलों केवळ मीच किनारा !

## झिंग

गाभुळलेली मधाळ आशा
   कांहिं चाळवी हेतु आगळा
दिशा ओतिती जांभुळलेली
   धार नशेची माझ्या डोळां

रंगतरंगीं शहारलेली
   हुरळ वाहते अंगांगांतुन
वादळांतली राळ प्राशिली
   घ्याया मीं पृथ्वीला कवळुन

आणि जाणवे याच नशेची
   झिंग तुझ्यांतहि शिरशिरलेली
मृगनयनांतिल बुजरी रेषा
   नयनीं तुझिया धिटावलेली !

# कळल्यावर

नेत्रीं रांगे माझ्या
चैत्रघनांची रांग
घेइ निरखुनी तरतें
दरवळणारे रंग

शब्दाविण अर्थांचा
तुला सुटावा गुंता
तरल्याविण उमगावी
रितेपणाची गाथा

विस्मित तूं होउनियां
मम डोळयांत शिरावें
कळल्यावर नकळुनही
डोळयांनींच हंसावें !

# आगमन

तुझें आगमन अंगचोरटें
वाजत नाहीं रेशिमपाउल
जरी प्रतीक्षा जागविणारी
लागत नाहीं भुरटी चाहुल

हुळहुळले नच ओंठांवरतीं
संकेताचे शब्दच कांहीं
हुरहुरले नच मंतरलेले
तसे मनांतुन हेतुच कांहीं

नको अशी ही सहवासाला
निर्वाताची दक्षिण-उत्तर
नकोच आहे आवर्ताला
झुळकीहुनही हलकी फुंकर

ये येतांना पाउल रुजवित
आणि हिरावुन घे माझेपण
जा जातांना चाहुल ठेवुन
आणिक हरवुन इथें तुझेपण !

## मनाच्या गुहेंत

मातीच्या घामाची
दाण्याला शिंपण
साहे उपोषण
तीच माती !

लौकिकाचें उभें
अंगणांत हास्य
दाराआड दास्य
किंचाळतें !

काजव्यांनीं रात्र
जागवावी किती
लाजवावी पणती
कोठवरी !

उधार विकते
बाजरीं अनीती
रोखीचीही नीती
महागली !

मनाच्या गुहेंत
आशांचें मरण
अंधारीं सरण
प्रकाशाचें !

## आस

नभाहुनी उंच
इच्छिताची रास
आसक्त मिठीचा
उणा पडे व्यास

दिवसाला पंग
अंधाराला डोळे
संध्येच्या पोटांत
पूर्वेचे डोहाळे

अजून जागते
मुकेलेली खंत
उरीं जखमेचा
पाहायचा अंत

ठेंचाळलों जरी
गती ना शिणली
इप्सिताची वाट
माझ्या पायांखालीं

अशी भिजलेली
रक्तांतून वीज
अशी भिनलेली
देहांत या झुंज !

# हवें—नको

गोड साखरी मृदु शब्दांचे
बंध नको मज विरघळणारे
नको गंधही रात्रबावरे
गात्र गात्र हरवुन नेणारे

वातीचें तेलाचें नातें
हवें हवें मज जळण्यामधलें
भिजाळलेल्या धूलिकणांचे
दर्प वहावे ओले ओले

औदार्य खुळें नकोच आहे
सौंदर्याला रंगावलिचें
ऊर शमाया सूर नसावे
मैफलींतले वैफल्याचे

दृष्टिरेषेवरतीं केवळ
काजळकडाच रेंगाळावी
दुःखमुक्त अन् अंतरांतुनी
हुंकाराची धून उठावी

## रुसवा

नच कधीं विसरावा
अशब्दसा तव रुसवा
उडउडत्या नाकाचा
फुगफुगल्या गालांचा

नजरेंतिल फसवेपण
श्वासांतिल दुखरेपण
भुलवी मम अंतरंग
बादळून ये अंग अंग

फुगव्याला गांव ना
दुखव्याला नांव ना
ठावें नच तळमाती
उथळ वा खोल किती

तरि वाटे तव रुसवा
शब्दसुरांतुन गुंफावा
असुं द्यावा स्मरणांत
निद्रेंतहि स्वप्नांत !

## तें माझें घर नाहीं

एकमेकींना सांवरून धरीत
तीन भिंती उभ्या,
भिंतींशीं फारकत घेऊन
कललेला एकुलता एक खांब,
पडतेपणींहि पाय रोंवून
वेडापिसा झुकलेला,
पिसाच्या झुकत्या मनोऱ्याची
खडबडीत प्रतिकृति !
पंचकोनी चौकटीचें
चिडीचिप हवेलाही भेदरणारें
हादरणारें दार नाहीं
तें माझें घर नाहीं !

सदाच मिटलेली
आणि सदाच उघडी
बेफिकीर अर्धी खिडकी,
जमिनीवर नीट चालतांना
पावलांची चाल दुडकी,
अजूनहि उखळल्याच्या खुणा
भुईनें एके काळीं गिळलेल्या
एक नव्हे, अगणित चाकांच्या,
पहुडतों आम्ही, आमचीं बाळें
तिथेंच मगरीच्या पाठीवर !

धुमसत जळणाऱ्या उषास्वप्नांचा
उशाखालींच धूर नाहीं
तें माझें घर नाहीं !

रात्रीचा प्रकाश येतांना आणतो
घुबडाच्या बुबुळांतील भावली,
डोळ्यांत बोट न घालतांहि
स्वच्छ दिसणारा काळोख,
हींव भरलेल्या शिशिराची
उबटपणांतल्या उबेशीं ओळख,
उन्हाळ्यांत सूर्य डोईवर
मध्याह्नींची धरतो सांवली,
आढ्यावरच शिजतात बेत
पावसाच्या नक्षत्रांचे !
आभाळाचें छप्पर नाहीं
तें माझें घर नाहीं !

भकासपणाचा उघडा जबडा
कराल करवती दांतांचा,
निःस्तब्धतेची त्यांतच जांभई,
आत्मविश्वास नाहीं
घुसमटणाऱ्या श्वासांना
निःश्वासांच्या परतभेटीचा,

दा. क्र. १५५६३

डोळ्यांपुढें चमकणारे काजवे
आंधळे आपल्याच उजेडांत !
एकलेपणामध्यें या जागेला
तेवढाच एक दिलासा म्हणून
घिरव्यांचीं वर्तुळें काढणारी
छताखालीं घार नाहीं
तें माझें घर नाहीं !

दिवसभराच्या श्रमाचें प्रतिबिंब
चिंब झाल्यानंतर
घामाच्या थेंब थेंब आरशांत
जेव्हां परतीची ओढ
मावळतीचा घेते निरोप, तेव्हां
मुक्या मनाच्या सुक्या फांदीला
बिलगून येतात सुखकल्पनेच्या
चारदोन स्वप्निल कळ्या !
वाट पाहणाऱ्या उंबऱ्यापाशींच
त्यांचीं होतात उंबराचीं फुलें !
भवितव्यालाच घरघर नाहीं
तें माझें घर नाहीं !
— तें माझें घर नाहीं
जिथें राहूनहि मी बेघर नाहीं ! !

## स्वर्गस्वप्न

रात्रभराची चमकुन बिजली होती नुकती विझली
दहिंवरांतुनी परतुन जातां काया तव गे भिजली
येतांना आणिलीस नातीं स्निग्ध रेशमी हुकमी
खय्यामाची सुरई सोबत करावयास रिकामी !

ल्याली होतिस पुष्पदलांचें गहिरें वस्त्र गुलाबी
अंगांगांतुन दरवळणारा मंद सुगंध शराबी
उघडमिटीच्या दोन पापण्या पाकळ्याच फुलपंखी
निर्झरिणीचे झुळझुळणारे चाळ पदीं नवलाखी !

मुग्धपणांतच गान विखुरलें, दान मिळे स्वर्गाचें
शुभ्र किरण शुक्राचे आले खुलवित अभ्र नभींचें
जगांतल्या या रितेपणाचा हवाच होता विसर
जितेपणाची एक तेवढी जाणिव पदरीं प्रखर !

स्वर्गस्वप्न अनुभविलें पुरतें उरून तरिही राहे
उरल्यासाठीं जगणें आणिक पुन्हां जागणें आहे
परतुन जातां दंवांतुनी तव भिजला देह-फुलोरा
मोरपिसानें पुशीत गेला खुषींत पहांटवारा !

## फक्त उरावी याद

आठवे मला, क्षितिजकडा तव पाहुन मुखडा
रहस्य शिकली ओशाळीचें भल्या पहाटें
तृप्ती ना गगनांत मावली दोन मनांची
नच कळलें वैफल्य पळालें कवण्या वाटें

घडलेलें अन् अवघडलेलें स्मरतों सारें
स्वप्नगीतिका नेत्रदलीं ती तूं रचलेली
सुरांगनेच्या पैंजणांसवें भिंतीवरल्या
किणकिणतांना एक बांगडी तव टिचलेली

असें क्षणिकसें कांहिं आजला नकोच मजला
जीवितभर आठवणींचा हाच पुरे स्वाद
मूर्त स्मृतींच्या जगांत केवळ जगत रहावें
प्रीति विरावी नश्वर, फक्त उरावी याद !

दा. क. 15503
REFBK-0015573
REFBK-0015573
मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत
अनुक्रम 63660 वि: 9124
9233 नोंद दि: 24-4-67